स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या सामाजिकशास्त्रे विद्याशाखे अंतर्गत समाजशास्त्र विषयात पीएच.डी. (Ph.D.) पदवीसाठी सादर करावयाचा प्राथमिक संशोधन आराखडा.

❍ संशोधन आराखडा ❍

महिला सक्षमीकरणात जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण समितीची भूमिका : एक समाजशास्त्रीय अध्ययन (विशेष संदर्भ नांदेड जिल्हा)

❒ संशोधक ❒

प्रा. सकरगे नागोराव विठ्ठलराव

(एम. ए., एम.फिल, नेट)

समाजशास्त्र विभाग

दिगंबरराव बिंदू कला व वाणिज्य महा. भोकर

जि. नांदेड

❒ मार्गदर्शक ❒

डॉ. भिसे रामचंद्र मुंजाजी

(एम. ए., एम.फिल, पीएच.डी., नेट)

समाजशास्त्र विभागप्रमुख

दिगंबरराव बिंदू कला व वाणिज्य महा. भोकर

जि. नांदेड

ऑगस्ट - २०१६

महिला सक्षमीकरणात जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण समितीची भूमिका : एक समाजशास्त्रीय अध्ययन

(विशेष संदर्भ नांदेड जिल्हा)

प्रस्तावना :-

प्राचीन भारताचा विचार केला तर आपल्याकडे गार्गी आणि मैत्रेयी यांच्यासारख्या प्रसिध्द महिला तत्वज्ञ होऊन गेल्या. पुरुषा इतकाच सन्मान त्यांनाही दिला गेला आणि वेगवेगळया चर्चांमध्ये त्या पुरुषांच्या बरोबरीने सहभागी झाल्या होत्या, इतकेच नाही तर भारताच्या स्वातंत्र्यलढयातही महिलांचे योगदान पुरुषांपेक्षा कमी नाही, राष्ट्रपिता महात्मा गांधीनी जेव्हां स्वातंत्र्य लढयात महिलांना सहभागी होण्याचे आव्हान केले तेव्हा फक्त दोन टक्के महिला सुशिक्षित होत्या, पण तरीही संपूर्ण देशातल्या महिलांनी गांधीजीच्या हाकेला प्रतिसाद दिला आणि चलेजाव चळवळीत त्यांना उतरवले. प्राचीन काळी महिलांना घराबाहेर पडणे कठीण होतं, याचा अंदाज आपल्याला आहे, तरीही त्यांनी ते करुन दाखवले. स्वातंत्र्यानंतर स्वतंत्र भारताची राज्यघटना तयार करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या समितीत महिलांनाही स्थान देण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिफारशीनुसार देशातील महिलांना अत्यंत मौल्यवान असा मतदानाचा हक्क देण्यात आला. ही नक्कीच अभिमानाची गोष्ट आहे. जगातील खुपच कमी देशामध्ये महिलांना हा अधिकार दिला गेला आहे.

इतक सगळं असतांना आजही आपल्या समाजात हुंडाबळी, बालविवाह, स्त्रीभ्रूण हत्या, बालहत्या, बलात्कार यासारख्या अनिष्ठ रूढी परंपरा भारतीय समाजात दिसून येतात ही आपल्या समाजासाठी दुर्दैवाची बाब आहे. या अशा

अनेक समस्यांचे उच्चाटन होण गरजेच आहे. स्त्रियांचे सबलीकरण हा गेल्या काही वर्षात शासकीय धोरणे, योजना, आंतरराष्ट्रीय संस्थाचे उपक्रम इत्यादीचा अग्रक्रमाचा विषय झाला आहे. या EMPOWERMENT संकल्पनेसाठी सबलीकरण, बलशालीकरण असे शब्द सध्या प्रचलित आहेत. वंचित घटकाची दडपवणुक संपविण्याची प्रक्रिया असा ह्या शब्दाचा स्थूल मानाने अर्थ आहे. कोणत्याही व्यवस्थेत काही समाजघटक सत्तेपासून व हक्कापासून वंचित राहतात. त्या व्यापक व्यवस्थेचा भाग असणाऱ्या काही संरचना आणि प्रक्रियांमुळे काही घटकांना अनेक प्रकारच्या संधीपासून आणि निर्णय प्रक्रियेतील सहभागापासून वंचित राहावे लागते. स्वतःच्या जीवावर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष परिणाम करणाऱ्या कोणत्याही गोष्टी घडवून आणण्याचे वा घडू नयेत हे पाहण्याचे त्यांचे सामर्थ्य हिरावले जाते. असे घटक एक व्यक्ती म्हणून आणि समूह म्हणूनही वंचित असतात सबलीकरणाची प्रक्रिया या घटकाचे दुर्बलीकरण संपविण्याची प्रक्रिया असते.

भारत हे लोकशाही प्रधान कल्याणकारी राज्य आहे. याचाच अर्थ समाजातील सर्व स्तरातील स्त्री-पुरुष व बालकांना विकासाच्या समानसंधी उपलब्ध करून देत असतांना प्रत्येकाच्या कल्याणाचा विचार केला जातो. सामान्यतः महिला सबलीकरण संकल्पनेचा उगम आधुनिक काळात झाला. महिला सबलीकरण म्हणजे स्त्रियांना स्वावलंबी बनविणे असा ढोबळ मानाने अर्थ काढता येतो. सामाजिक दृष्टिकोनातून स्त्रियांवर अन्याय सुरु आहे. या अन्यायाची भरपायी करणे म्हणजेच महिला सबलीकरण होय. थोडक्यात महिलांना सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक, धार्मिक व

प्रशासकीय क्षेत्रात योग्य प्रमाणात सहभागी करून निर्णय प्रक्रियेत सामिल करणे म्हणजेच महिला सबलीकरण होय.

देशाचा विकास आणि महिला सबलीकरण याचा निकटचा संबंध आहे. भारतातील समाजव्यवस्थेत व जातिव्यवस्थेमध्ये महिलांना अत्यंत काडीमोल व हिन दर्जाचे मानले जाते विशेषतः मनुस्मृती, वर्णव्यवस्थेमध्ये स्त्रीला शुद्रापेक्षाही अतिशुद्र मानले आहे. भारतात महाभारत, रामायण या प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत महिलांवर सदैव अन्याय व अत्याचार केला जातो. तसेच महिलांना दुर्बल व अबला म्हणून वागविले जाते. त्यामुळेच भारताचा विशेषतः भारतीय महिलांचा अपेक्षित विकास होऊ शकला नाही, भारतीय समाजाच्या विकासामध्ये महिला सबलीकरण, आरोग्य व बालकल्याण, आर्थिक बचत, शासकीय योजना आणि सामाजिक समस्या सोडविण्यासाठी देखील महिला सबलीकरण गरजेचे आहे.

म्हणून संशोधकाने **महिला सक्षमीकरणात जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण समितीची भूमिका : एक समाजशास्त्रीय अभ्यास (विशेष संदर्भ नांदेड जिल्हा)** संशोधन विषयाचे शिर्षक निवडले आहे.

संशोधनाचे महत्त्व :-

भारतीय कुटुंब व्यस्थेमध्ये पुरुषापेक्षा महिलांचे योगदान अधिक आहे. कारण पुरुष हा जेंव्हा घराबाहेर नौकरी किंवा इतर काम करत असतो. तेव्हा घर सांभाळणे, कुटूंबातील अडीअडचणी ही सर्व कामे महिलांना करावी लागतात तसेच भारतामध्ये पुरुषप्रधान कुटूंब व्यवस्था असली तरी काही जाती जमातीमध्ये मातृसत्ताक कुटूंब पध्दती कार्यरत आहे व ही पध्दती पुरुषप्रधान कुटूंब पध्दतीच्या

तुलनेत श्रेष्ठ व चांगली असल्याचे दिसून येते. म्हणून कुटूंबाच्या कल्याणासाठी देखील महिला सक्षमीकरणाची गरज आहे. यासाठी प्रस्तुत संशोधन आवश्यक आहे.

समाजातील बाल-गुन्हेगारी, सतीप्रथा, देवदासीप्रथा, वाढती लोकसंख्या, बालविवाह, बलात्कार, दारु व इतर मादक पदार्थाचे सेवन, विभक्त कुटूंब पध्दती, वेश्या व्यवसाय आणि अंधश्रध्दा या सारख्या सामाजिक प्रश्नांबाबत महिलांमध्ये जागृती निर्माण केल्यास व या समस्या सोडविण्यासाठी महिलांची मदत घेतल्यास सामाजिक समस्या कमी करण्यासाठी शासनाला मदत होईल. त्यामुळे सामाजिक समस्या सोडविण्यासाठी देखील महिला सक्षमीकरणाचे महत्त्व आहे.

भारताचा विकास हा ग्रामीण भागावर अवलंबून आहे. जोपर्यंत ग्रामीण विकास होत नाही तोपर्यंत देशाचा विकास होणार नाही. कारण आजही भारतातील जास्तीत जास्त लोक ग्रामीण भागात राहतात. त्यात 50% लोकसंख्या ही महिलांची आहे. तसेच शेतीतील बरेच कामे ही महिलांमार्फत केली जातात. म्हणून ग्रामीण विकासासाठी सुध्दा महिला सबलीकरणाची गरज आहे.

देशातील जनतेला निरोगी ठेवण्यासाठी प्रशासन अनेक सुविधा पुरविते विशेषतः बालकांच्या आरोग्यासाठी लसीकरण, स्वच्छता व आहार इत्यादी बाबत महिलांची भूमिका महत्त्वाची आहे. कारण आरोग्य, बालसंगोपन, बालकल्याण या बाबत महिलांमध्ये जाणीव जागृती केल्यास संपूर्ण कुटूंबाचे आरोग्य चांगले राहू शकते म्हणून संशोधकाने प्रस्तुत विषय अभ्यासासाठी निवडला.

केंद्र व राज्यशासनामार्फत ज्या विविध योजना व कार्यक्रम राबविले जातात. त्यामध्ये स्वच्छता अभियान, जल संवर्धन, सर्वांसाठी शिक्षण, आरोग्य व लसीकरण, दारिद्र्य निर्मूलन इत्यादी योजनामध्ये महिलांचा सहभाग जास्त दिसून येतो. त्यामुळे या योजना यशस्वी होण्यास मदत होते. म्हणून विकास योजनांची व कार्यक्रमाची योग्य अंमलबजावणी करण्यासाठी महिला सक्षमीकरण गरजेचे आहे. त्यासाठी संशोधकाने **महिला सक्षमीकरणात जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण समितीची भूमिका : एक समाजशास्त्रीय अध्ययन** या विषयाची निवड केली आहे.

समस्या आणि स्वरूप :-

भारतीय राज्यघटनेच्या कलम 14 नुसार सर्व व्यक्ती कायद्यासमोर समान आहेत. कलम 15 नुसार जात, धर्म, लिंग इ. च्या आधारे नागरिकांत मतभेद केला जाणार नाही तर 16 व्या कलमानुसार शैक्षणिक पात्रता असणाऱ्या स्त्री-पुरुषास शासनात कोणतेही पद प्राप्त करता येईल. या हक्कामुळे स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने सर्व क्षेत्रात वावरतांना दिसतात. महिलांना राजकारणात सहभाग घेण्याचा, मतदान करण्याचा आणि निवडणुकीला उभे राहून निवडणूक लढविण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे.

भारतीय संस्कृती पुरुषप्रधान म्हणून ओळखली जाते. पुरुष वर्गाने महिलांना कमी लेखून त्यांचे क्षेत्र चूल आणि मूल एवढेच मर्यादित केले. त्यांना बुध्दी नसते, त्या दुर्बल असतात, कोमल अंतकरणाच्या असतात म्हणून त्यांना सामाजिक, आर्थिक, राजकिय आणि सांस्कृतिक क्षेत्रामध्ये विकास करण्याकरिता वाव दिला जात नाही. महिला आणि तंत्रज्ञानाच्या आजच्या काळात देखील

महिला साक्षरतेचे प्रमाण केवळ 35% पेक्षा कमी आहे. तसेच आजही 72% महिला आर्थिक दृष्ट्या परावलंबी आहेत. काही स्त्रियां पती किंवा मुलांवर अवलंबून आहेत. 28% स्वावलंबी आहेत, परंतु तीचे सामाजिक स्वातंत्र्य एक तर तिच्या पतीने किंवा समाजाने मर्यादित केले आहे. म्हणून प्रस्तुत संशोधनाची अध्ययनासाठी निवड करण्यात आली आहे.

आधुनिक समाजातील संस्कृती ही पुरुषप्रधानही नाही व स्त्रीप्रधानही नाही तर ती अर्थप्रधान आहे. म्हणून महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी, राजकीय व प्रशासकीय सहभागासाठी त्यांना आर्थिक स्वावलंबी होणे गरजेचे आहे. असे झाल्यास कोणताही अधिकारी किंवा नेता असलेल्या महिलांच्या निर्णयावर पुरुष आपले वर्चस्व गाजवू शकणार नाही.

आजही ग्रामीण भागातील महिलांचे जीवन अनेक समस्यांनी ग्रस्त आहे. जसे मुलींच्या जन्माचे स्वागत नाही. मुलगा हाच वंशाचा दिवा, शिक्षणाचा अभाव, अंधश्रध्दा, आरोग्याचा प्रश्न, आर्थिक स्वातंत्र्याचा अभाव, वेश्या व्यवसाय, कुटूंबातील महिलांचे स्थान आणि पती-पत्नीतील अंतर, महिलांच्या चारित्र्याचा संशय, लैगींक छळ, इत्यादीवरील प्रश्नांना आजही भारतीय समाजातील महिलांना सामोरे जावे लागते. म्हणून प्रस्तुत संशोधनासाठी निवडलेल्या विषयात महिला सक्षमीकरण म्हणजे काय? महिला सक्षमीकरणाचे उद्देश ? महिला व बालकल्याण समितीची संरचना आणि कार्यपध्दती कशी आहे? महिला व बालकल्याण समितीच्या योजना व कार्यक्रमाची महिला सक्षमीकरणात काय भूमिका आहे. अशा अनेक प्रश्नांना डोळयासमोर ठेवून **महिला सक्षमीकरणात जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण समितीची**

भूमिका : एक समाजशास्त्रीय अध्ययन (विशेष संदर्भ नांदेड जिल्हा) या विषयाची निवड केली आहे.

- **संशोधनाची उद्दिष्टये :-**

1) महिला सक्षमीकरणाची संकल्पना समजून घेणे.
2) महिलांच्या विविध समस्या व प्रश्नांची ओळख करून घेणे.
3) महिलांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.
4) जिल्हा परिषदेच्या महिला व बाल कल्याण समितीच्या कार्याचा आढावा घेणे.
5) जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण समितीची महिला सक्षमीकरणातील भूमिका तपासणे.
6) जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण समितीच्या विविध योजना व कार्यक्रमाचा आढावा घेणे.
7) महिला सक्षमीकरणासाठी ठोस उपाय योजना सुचविणे.

- **गृहितकृत्ये :-**

1) अंधश्रध्दा, निरक्षरता, आर्थिक मागासलेपणा व लिंगभेदाची भावना महिला सक्षमीकरणात अडसर ठरत आहे.
2) लिंगभेदाच्या भावनेमुळे पुरुषांपेक्षा महिलांचा सामाजिक व आर्थिक दर्जा कनिष्ट ठरत आहे.
3) महिलाच्या सक्षमीकरणासाठी महिला व बालकल्याण समितीची भूमिका महत्त्वाची ठरलेली आहे.
4) महिला व बालकल्याण समितीच्या विविध योजना व कार्यक्रमाची माहिती महिलांपर्यंत पोहचत नाही.

5) महिला सक्षमीकरणांबाबत महिला व बालकल्याण समितीतील अधिकारी व पदाधिकारी उदासीन आहेत.

संशोधन अभ्यासाची व्याप्ती आणि मर्यादा :-

प्रस्तुत संशोधन विषय महिला सक्षमीकरणात जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण समितीच्या भूमिकेचा अभ्यास करण्यासाठी निवडला असून या विषयाची व्याप्ती नांदेड जिल्ह्यापुरतीच मर्यादित आहे. आणि प्रस्तुत संशोधनात जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण समितीच्या महिला सक्षमीकरणातील भूमिकेचा व कार्यपध्दतीचा आणि योजनांचा आढावा घेण्यात येईल. सदरील संशोधन हे 2005 ते 2015 या कालावधीतील योजनांच्या अभ्यासापूरतेच मर्यादित राहील.

संशोधन पध्दती :-

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी वर्णनात्मक संशोधन आराखडयाचा (Descriptive Research Design) समस्येबाबत वास्तविक तथ्याच्या आधारावर विवेचन करणे हा वर्णनात्मक संशोधन आराखडयाचा मुख्य उद्देश असतो.

विविध सामाजिक शास्त्रात सामाजिक घटकांचा आणि वास्तव परिस्थितीचा अभ्यास करावयाचा असेल तर त्या करिता संशोधन आराखडयाचे कार्य अत्यंत महत्त्वपूर्ण मानले जाते. संशोधन आराखडयाशिवाय सत्य घटनांची अभ्यास होऊ शकत नाही. म्हणून सामाजिक संशोधनात संशोधन आराखडयाचा उपयोग महत्त्वपूर्ण साधन म्हणून केला जातो. वर्णनात्मक संशोधन आराखडयाचा वापर करूनच त्या समुहाच्या स्थितीचे व वैशिष्टयांचे वर्णन करता येते. त्यामुळेच

हा आराखडा उपयुक्त ठरतो. त्यामुळेच प्रस्तुत संशोधनाचे कार्य पूर्ण करण्यासाठी वर्णनात्मक आराखडयाचा उपयोग करण्यात येणार आहे.

सैध्दांतिक आधार :-

समाजशास्त्रातील स्त्री अभ्यास या शाखेशी संबंधित असून त्यामधील महिला सक्षमीकरण या मूलभूत संकल्पनेचा आधार घेऊन हे संशोधन कार्य पूर्ण केले जाईल.

नमुना निवड :-

नांदेड जिल्ह्यातील वेगवेगळया 16 तालुक्यापैकी महिला व बालकल्याण समितीच्या योजना आणि कार्यक्रमाचा सर्वाधिक लाभ घेतलेल्या 10 तालुक्याची प्रत्यक्ष अध्ययनासाठी निवड करण्यात येईल या एकूण 10 तालुक्यातून प्रत्येक 05 गावाची अशा एकूण 50 गावाची निवड करण्यात येईल. या प्रत्येक गावातून महिला व बालकल्याण समितीच्या योजनांचा व कार्यक्रमाचा लाभ घेतलेल्या यादी मिळवून लाभार्थीची लॉटरी पध्दतीने 05 महिलांची निवड करून अशा एकूण 250 उत्तरदात्याची निवड करण्यात येईल. ही निवड यादृच्छिक नमुना निवड पध्दतीने करण्यात येणार आहे.

तथ्य संकलनाचे स्त्रोत :-

प्रस्तुत संशोधन अध्ययनासाठी पुढील प्रमुख तथ्य संकलन स्त्रोतांचा वापर करून वस्तुनिष्ठ माहिती प्राप्त करण्याचा प्रयत्न केला जाईल.

1) प्राथमिक स्त्रोत :-

प्रस्तुत शोध अध्ययनासाठी उपयुक्त असलेली वास्तव माहिती मिळविण्यासाठी नांदेड जिल्ह्यातील एकूण 10 तालुक्यातून, प्रत्येकी एका

तालुक्यातील पाच गावातील 05 लाभधारक महिलांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांच्याकडून मुलाखत अनुसूची भरुन घेतल्या जातील. मुलाखत अनुसूची तंत्राचा वापर करून योग्य ती महत्वपूर्ण माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला जाईल. व त्याचबरोबर निरीक्षण तंत्राचा वापर करून उपयुक्त माहितीचे संकलन करण्यात येईल.

2) दुय्यम स्त्रोत :-

प्रस्तुत शोध कार्याचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी आवश्यक ती संपूर्ण माहिती प्राप्त करून घेण्यासाठी प्रकाशित व अप्रकाशित अशा दुय्यम स्त्रोतांचा उपयोग करण्यात येणार आहे. संशोधन विषयाशी संबंधित माहितीचे संकलन करण्यासाठी वेगवेगळया ग्रंथलयांना व प्रकाशकांना भेटी देऊन व या विषयांशी साम्य असणाऱ्या विषयाचे अध्ययन करणाऱ्या सर्व संस्थांशी संपर्क करून यथोचित माहिती प्राप्त करण्याचा प्रयत्न असेल. प्रस्तुत विषयाशी निगडित वर्तमान पत्रातील लेख, मासिके, साप्ताहिके, संदर्भ ग्रंथ व इंटरनेट सेवा इत्यादींचा वापर करून वस्तुनिष्ठ माहिती मिळविण्याचा प्रयत्न करून व त्याआधारे मिळविलेल्या माहितीचे विश्लेषण करून निष्कर्ष काढण्यात येतील.

तथ्य विश्लेषण :-

प्रस्तुत संशोधनाचे अध्ययन करण्यासाठी ज्या माहितीचे संकलन केले जाईल त्या माहितीवर प्रक्रिया करण्यासाठी 'की' (Key) आणि संकेतन/ सांकेतिकरण (Coding) करण्यात येईल त्यानंतर सांख्यीकीय माहितीचे तक्ते बनवून माहितीचे वर्गीकरण व विश्लेषण करण्यात येईल तसेच काही तथ्य ही

दुय्यम स्त्रोतांच्या आधारे संकलित करून त्या माहितीचे व्यवस्थीत विश्लेषण व अर्थनिर्वचन करून निष्कर्ष काढण्यात येतील.

संशोधन अहवालाची मांडणी :-

प्रस्तुत संशोधन अहवालाची प्रकरण रचना पुढील प्रमाणे करण्यात येईल.

प्रकरण : पहिले - प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणात महिला सक्षमीकरणाचा अर्थ, उद्देश, स्वरुप व व्याप्ती इत्यादी चा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण : दुसरे - सामाजिक संशोधन पध्दती

प्रस्तुत प्रकरणात संशोधन विषयाची प्रस्तावना, संशोधन विषयाचे महत्त्व, समस्या व स्वरुप, संशोधनाचे उद्दिष्टे, संशोधनाचे गृहितकृत्ये, संशोधनाची व्याप्ती व मर्यादा, नमुना निवड व तथ्य संकलन आणि संशोधन अहवालाची मांडणी.

प्रकरण : तीसरे - महिला व बालकल्याण समिती : योजना व कार्यक्रम

प्रस्तुत प्रकरणात जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण समितीच्या संरचना व कार्यपध्दतीचा तसेच महिला व बालकल्याण समितीने महिला सक्षमिकरणासाठी राबविलेल्या विविध सामाजिक, आर्थिक, व्यावसायिक व राजकीय योजनांचा व कार्यक्रमाचे सविस्तर वर्गीकरण करण्यात येईल.

प्रकरण : चौथे - महिला सक्षमिकरणात जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण समितीची भूमिका

प्रस्तुत प्रकरण हे प्राथमिक तथ्य संकलनावर आधारित आहे. या प्रकरणात जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण समितीद्वारे राबविलेल्या योजना व कार्यक्रमाचे मुल्य मापन करण्यात येईल. मुलाखत अनुसुचीच्या आधारे संकलीत केलेल्या तथ्यांचे विश्लेषण सदरील प्रकरणात करण्यात येईल.

प्रकरण : पाचवे - निष्कर्ष व शिफारशी

प्रस्तुत प्रकरणात संशोधन अध्ययनातून मिळालेल्या माहितीच्या आधारे प्रमुख निष्कर्ष काढले जातील आणि त्यावर काही प्रमुख शिफारशी सुचविल्या.

--❖--❖---❖--

संदर्भग्रंथ सूची :-

1) सामाजिक शास्त्राची संशोधन प्रणाली- डॉ विजय एल. जरारे, अद्वेत प्रकाशन अकोला (2004).
2) सामाजिक संशोधन पध्दती - डॉ. पू.ल. भांडारकर,महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर (1987)
3) भारतीय समाज एवं महिला सशक्तीकरण - डॉ. रामचंद्र मुंजाजी भिसे, विकास प्रकाशन कानपुर (2013)
4) महिला सशक्तीकरण का सच- मीनाक्षी निशांत सिंह, ओमेगा पब्लीकेशन्स, नई दिल्ली.
5) मानवाधिकार और महिला एँ- राजवाला सिंह, अविष्कार पब्लीशर्स, डिस्ट्रीब्यूटर्स जयपूर
6) महिला व बालकल्याण - डॉ. एस. टी. शिरसाठ, चिन्मय प्रकाशन औरंगाबाद.
7) स्त्री प्रश्नाची चर्चा-रानडे प्रतिभा, पॉप्युलर प्रकाशन मुंबई (1991)
8) भारतातील सामाजिक समस्या- पी.के. कुलकर्णी, विद्याप्रकाशन, नागपूर (1998)
9) मासिके -

    1) योजना   2) कुरुक्षेत्र   3) समाजकल्याण   4) लोकराज्य

मार्गदर्शक

डॉ. रामचंद्र मुंजाजी भिसे
समाजशास्त्र विभाग प्रमुख,
दिगंबरराव बिंदू महा. भोकर
जि. नांदेड

संशोधक

प्रा. सकरगे एन.व्ही
समाजशास्त्र विभाग
दिगंबरराव बिंदू महा. भोकर
जि. नांदेड